महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित,

**के.बी.एच. दंत महाविद्यालय व रूग्णालय,**

पंचवटी, नाशिक - ४२२ ००३

---

# बातमी

## अन्वेषण-२०१८- कर्मवीर भाऊसाहेब हिरे दंत महाविद्यालयातील डॉ. प्रिथा नेगी व डॉ. शिरीष पवार यांना अन्वेषण-२०१८ वेस्ट झोन मध्ये प्रथम पारितोषीक

नाशिक - महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित, कर्मवीर भाऊसाहेब हिरे दंत महाविद्यालयातील डॉ. प्रिथा नेगी व डॉ. शिरीष पवार यांना अन्वेषण -२०१८ या विद्यार्थी संशोधन परिषदेत हेल्थ सायन्स या प्रवर्गामध्ये प्रथम पारितोषीक व गोल्ड मेडल मिळाले आहे. अन्वेषण-२०१८ विद्यार्थी संशोधन परिषदेमध्ये महाराष्ट्र, गुजरात व राजस्थान या राज्यातील एकूण १४३ संशोधन प्रकल्प सहभागी झाले होते. ही परिषद गुजरात येथील गणपत विद्यापीठ मेहसाणा येथे १४ ते १५ फेब्रुवारी २०१८ दरम्यान पार पडली.

विद्यार्थ्यामधील संशोधन वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी अविष्कार ही राज्यस्तरीय संशोधन परिषद आयोजित केली जाते. या परिषदेमध्ये राज्यातील सर्व विद्यापीठातुन संशोधन प्रकल्प सादर केले जातात. राज्यस्तरीय निवड झालेल्या संशोधनास राष्ट्रीय परिषदेत पाठविले जाते.

अविष्कार-२०१८ या राज्यस्तरीय संशोधन परिषदेत निवड झाल्यानंतर डॉ. प्रिथा नेगी व डॉ.शिरीष पवार यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, यांचेकडून महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी अन्वेषण-२०१८ मध्ये पाठविण्यात आले होते.

कर्मवीर भाऊसाहेब हिरे दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय वसंत भावसार यांनी दंत शास्त्रातील अतिमहत्वाच्या ऑक्लुजला प्लेन शोधण्यासंबंधी नविन पध्दती शोधून काढली आहे. त्याचे प्रेझेंटेशन डॉ. शिरीष पवार व डॉ. प्रिथा नेगी यांनी केले.

डॉ. प्रिथा नेगी व डॉ. शिरीष पवार यांना त्यांच्या या यशाबद्दल महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी, मा. डॉ. प्रशांतदादा हिरे (मा. मंत्री), संस्थेचे समन्वयक मा. आमदार डॉ. अपूर्वभाऊ हिरे, संस्थेचे सह-सचिव डॉ. व्ही.एस. मोरे, विश्वस्त डॉ. प्रदिप जी.एल., दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय भावसार यांनी शुभेच्छा दिल्या.